# रामचंद्रपंत अमात्यांचे कार्य

(१६७४ - १७१६)

## रामचंद्रपंत अमात्यांचे कार्य

इ.स. १६७२ मध्ये निळो सोनदेवांचा मृत्यु झाला. आणि त्यानंतर नारो निळकंठ ( नारोपंत ) हे मुजुमदार झाले. पण ते कारभार पहाण्यास लायक नव्हते असा उल्लेख अनेक साधनामधून मिळतो. " .... यांच्या मनाची प्रवृत्ती प्रपंचापेक्षाही परमार्थाकडे फार होती. यानी आपले लग्नही करुन घेतले नाही. यांचा बहुतेक वेळ स्नान संध्या जप-जाप्य यात जात असे. अशी याची विरक्त वृत्ति पाहून शिवाजी या हुद्द्या संबंधाचे सर्व काम याचे कनिष्ठ बंधु रामचंद्रपंत याचे हातून घेऊ लागला.[१] "

### रामचंद्रपंत - अमात्य ( १६७४-७७ )

यावरुन असे वाटते की रामचंद्रपंताकडे मुजुमदारीचे काम १६७२ पासूनच पहात होते, पण प्रत्यक्षात हुद्दा मात्र महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी मिळाला. ६ जुन १६७४ रोजी शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेतला व त्यावेळी अष्टप्रधानांची नेमणुक केली. त्यावेळीच रामचंद्रपंतांना अमात्यपद ( मुजुमदारी ) देण्यात आले.

राज्याभिषेकाचेवेळी रामचंद्रपंताचे वय जेमतेम बावीस तेवीस वर्षाचे होते असे स.मा.गर्गे म्हणतात. तर वा.सी.बेन्द्रे च्या मते राज्याभिषेकाचे वेळी त्याचे वय जेमतेम एकोणीस वीस वर्षाचे असावे. म्हणजेच गर्गे-बेन्द्रे यांचे म्हणणे ग्राह्य धरले तर पंताचा जन्म १६५० च्या सुमारास झाला असावा. त्याची जन्मतारीख आज उपलब्ध नाही.

इ.स. १६७४ पासून १६७७ पर्यन्त रामचंद्रपंत अमात्यपदावर होते. १६७७ मध्ये मात्र त्यांना काढण्यात आले. त्यावेळी त्याना अमात्यपदावरुन का काढले याची नक्की माहिती मिळत नाही. एक कारण संभवते ते म्हणजे १६७६ मध्ये

रघुनाथपंत हे व्यंकोजीच्या दरबारातून भांडून शिवाजीकडे आलेला होता. व्यंकोजीच्या दरबारातील तो एक महत्वाचा माणूस होता. शिवाजी महाराजांनी दक्षिणी दिग्विजयास जाणेचे ठरविले. त्यामुळे रामचंद्रपंताकडील अमात्यपद काढून ते रघुनाथपंताना देण्यात आले असावे असे वाटते.[२]

## रामचंद्रपंत - सचिव ( १६८०-८५ )

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर सोयराबाई व अण्णाजी दत्तो यांनी राजारामाला गादीवर बसविण्याचा बेत संभाजीला कळताच, तो १८ जून १६८० रोजी फौजेसह रायगडला आला आणि त्याने कटातील लोकांना तुरुंगात टाकले. २० जुलै १६८० रोजी संभाजी महाराजांनी सिंहासनारोहण केले. प्रत्यक्ष राज्याभिषेक १६ जानेवारी १६८० रोजी पार पडला. संभाजी महाराजांनीसुध्दा अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. त्यात नारोपंत हणमंते यास अमात्यपद तर रामचंद्रपंत निळकंठ यांना सचिवपदी नेमले. इ.स.१६८० ते १६८५ या कालखंडात रामचंद्रपंत सचिवपदावर होते.

संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत रामचंद्रपंत किंचित मागे पडला तरी संभाजीही त्यांची योग्यता जाणून होता. औरंगजेबचा मुलगा अकबर यांच्याबरोबर बोलणी करण्याची कामगिरी संभाजीने रामचंद्रपंतावर सोपविली होती. यावरुन संभाजी महाराजांच्या काळातसुध्दा रामचंद्रपंताच्याकडे महत्वाचे राजकारण होते हे दिसते. या विषयी संभाजी म्हणतो "रामचंद्रपंडित अमात्य या समागमे विस्तारे बोलोन खाना केले"[३]

रामचंद्रपंत अमात्य हे संभाजीच्या कारकिर्दीच्या आरंभापासून सचिवाचे काम करीत होते. तथापि संभाजीचा या व्यक्तीवर रोष होता. कारण रामचंद्रपंताने संभाजीच्या विरोधात सोयराबाईच्या कटामध्ये मदत केली होती. हा रोष पुढे कांही दिवसानी कमी होत होत नाहीसा झाला नंतर संभाजीने यास

कुडाळापासून नरगुंद नदीपर्यन्तचा देश स्वाधीन करून घेण्यासाठी पाठविले. रामचंद्रपंताने तिकडे जाऊन त्या प्रांताचा बंदोबस्त केला आणि आजुबाजुचा प्रदेश जिंकून मराठी राज्यात सामील केला.

"मे जून १६८० मध्ये अण्णाजी दत्तोला अटक केल्यानंतर सचिवपद कांही काळ आबाजी सोनदेवकडे दिले. ऑगष्ट १६८० मध्ये आबाजी सोनदेवाच्या मृत्युनंतर हे सचिवपद रामचंद्र निळकंठ भादाणेकर ह्यांना दिले. कुडाळापासून तुंगभद्रेपर्यन्तचा प्रांत त्यांच्या ताब्यात होता. त्यांच्याकडे १६८५ सालापर्यन्त सचिवपद होते. मे १६८५ मध्ये हे पद शंकराजीकडे दिले."[४]

परंतु वा.सी.बेन्द्रे यांच्या मते रामचंद्रपंताच्या गैर व शैथिल्य कारभारामुळे त्यांच्याकडील सचिवपद मे १६८५ मध्ये काढून घेतले. ते त्यांच्या हाताखालील शंकराजी नारायण यास दिले. यामुळे रामचंद्रपंत अपमानीत होऊन राहिले होते. म्हणून त्यानी संभाजीच्या विरुध्द असलेल्या गटात सामील होऊन आपले सचिवपद शंकराजी नारायणाकडून काढून घेतले. परंतु शंकराजीकडील मावळी सेना रामचंद्रपंताकडील युध्दविषयक अनिष्ठ कारभारामुळे त्याच्याकडे आली नाही.[५]

## रामचंद्रपंत - हुकूमतपन्हा ( १६८९-९८ )

११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांचा वध झाला आणि मराठ्यांच्या राज्याची सर्व जबाबदारी राजारामाकडे आली. ९ फेब्रुवारी १६८९ रोजी राजाराम छत्रपती बनला व मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द पुढे चालु राहिले. संभाजीला मारल्यानंतर मराठ्यांचे राज्य संपेल असे औरंगजेबाला वाटत होते पण राजारामाने आपल्या शूर सरदाराच्या सहाय्याने औरंगजेबची ही इच्छा पूर्ण होऊ दिली नाही . याच कालखंडात रामचंद्रपंताच्या कार्याचा खरा कस लागला.

संभाजीच्या वधानंतर औरंगजेबाच्या फौजेने राजारामाला पकडण्यासाठी रायगडाला वेढा घातला होता. राजारामने रायगडावर शिवाजी व येसूबाई यांना ठेऊन पन्हाळा व विशाळगडाकडे गेला. मोंगली फौजा पन्हाळा व

विशाळगड या भागात सुध्दा फिरू लागल्या म्हणून पन्हाळगडाहून लांब जिंजीस जाण्याचा निर्णय राजाराम महाराजांनी घेतला.

> "महाराजे राजश्री या प्रांताहून चंजीप्राते जाणे जाले. तत्समई संपुर्ण राज्य व लोक पाल स्वामीत्व राजश्री पंडित मशारनिल्हे रामचंद्रपंत यांचे गळा घालोन खासा स्वामींनी चंजी प्रांती स्वारी केली" [6]

रामचंद्रपंताना 'हुकमतपन्हा' हा किताब देऊन त्यांच्याकडे घाटमाथ्याचा बंदोबस्त सोपवून १६८९ मध्ये राजाराम महाराज जिंजीस निघून गेले. "घाटावर सातारा आणि कोंकणात रायगड या सीमा करून राजाराम महाराजांनी राज्याचे दोन भाग केले. उत्तरेकडील भाग शंकराजी नारायणाकडे व दक्षिणेकडील रामचंद्रपंताकडे दिला. स्वराज्यातील कारभाराचे सर्वाधिकार त्यांच्याकडे सोपविले आणि प्रजेने या दोघांची आज्ञापत्रे म्हणजे छत्रपतींची आज्ञापत्रे आहेत असे समजावे. " असे कळविले."[7]

जिंजीला जात असताना राजाराम महाराजांनी आपल्या सोबत कबिला नेणे योग्य नव्हते. जिंजीत आपला जम बसल्यानंतर कबिला तिकडे आणावा अशी राजाराम महाराजांची योजना होती. ह्यासाठी रामचंद्रपंतासारख्या विश्वासु माणसावर ही जबाबदारी सोपवून निघून गेले. "कबिल्यापाशी रामचंद्र निळकंठ याणी या प्रांती राहून तिकडे गेलियावरी कबिलेही युक्तीने काढोन पोहोचवावा अशी योजना केली होती."[8]

राजाराम महाराज जिंजीला पोहोचल्यानंतर व त्याठिकाणी स्थिरस्थावर झाल्यानंतर रामचंद्रपंतानी आपली कांही विश्वासु माणसे पाठविली व राण्यांच्या प्रवासाचा मार्ग ठरवला. यासाठी राजापुरातील लिंगो प्रभु व विसाजी शंकर प्रभु यांचे सहाय्य घेतले व राण्यांना यशवंतगडच्या बंदरात पाठवले. त्या ठिकाणी विसाजी शंकर प्रभु याने तारव्यातून राण्यांना मार्च १६९१ मध्ये जिंजीला पोहोचविले.[9]

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

" रामचंद्रपंत अमात्यांनी खंडोबल्लाळ चिटणीस यांचे आप्त राजापूर येथील विसाजी शंकर सावकार यास विशाळगडी बोलावून आणिले आणि त्याचे विश्वासुपणाची खात्री करुन घेऊन त्याचे जहाजातून राजकुटुंबाची रवानगी चंदीस केली." १०

रामचंद्रपंताने राजाराम महाराजांचा कबिला विशाळगडाहून जिंजीला अतिशय विश्वासु व चांगल्या माणसाच्याकरवी सुखरुपपणे रवाना केला ही एक अतिशय महत्वाची कामगिरी होती.

सन १६८९ हे साल मराठ्यांच्या इतिहासातील काळे वर्ष होय. यावेळी ना राज्य, ना राजा ना लष्कर असी विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. अशावेळी रामचंद्रपंतानी स्वत: मोहिमेवर न जाता विशाळगडास पाय रोवून सर्व मराठा मंडळ योजकपणे कामास जुंपले. रामचंद्रपंत ,शंकराजी नारायण, संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांनी सामुदायीक नेतृत्व निर्माण केले होते. सन १६८९ पासून रामचंद्रपंत विशाळगडाहून कारभार हाकत असल्याने विशाळगडास राजधानीचे स्वरुप आले होते.

सन १६९० साली या सर्व सरदारांनी गेलेली ठाणी व किल्ले परत मिळविण्याचा व मोगलांना खडे चारण्याचा सपाटा लावला. सन १६९० च्या मे पर्यन्त रामचंद्रपंतानी प्रतापगड जिंकून घेतला आणि वाईवर हल्ला केला व वाई जिंकून घेतली.

> " आम्ही स्वारी करुन वाईस आलो वाईचा कोट
> रगडून घेतला" ११

याच वेळी रामचंद्रपंतानी पन्हाळा व पावनगड येथील हवालदार वगैरे मंडळाशी संधान करुन दोन्ही किल्ले घेतले. तसेच याच वेळी झुल्फिकारखान याने रायगडाला वेढा घातला होता हा वेढा दहा महिने होता, शेवटी संभाजी पत्नी येसूबाई व मुलगा शाहु यांनी शरण येऊन तो किल्ला झुल्फिकारखानच्या ताब्यात दिला. त्यावेळी रामचंद्रपंत विशाळगडावर राहुन झुल्फिकारखानाच्या सैन्याला त्रास देत होता. " या समयात झुल्फिकारखान याणी दहा महिने

रायगडी बसोन तह करुन शिवाजी राजे यास व रायगडावरील सर्व मालमत्ता घेऊन गेले. पन्हाळाप्रांती फौजा गेल्या . कोकण प्रांतात पाऊस बहुत झाडी ठिकाण नाही. रामचंद्रपंतानी विशाळगड रांगणा बळकाऊन जागा जागा फौज घालवणे, मारणे करु लागले." [१२] ,

सन १६९० मध्ये सर्जाखानाने सातार्याला वेढा घातला होता. रामचंद्रपंतानी तो वेढा उठवून त्याच्याकडून एक लाख रु.खंडणी वसूल केली. "वैशाख वद्य व्दादसी (२५ मे १६९० ) सातारियास सर्जाखानाने वेढा घातला होता. त्यावरी राजश्री रामचंद्रपंडित सचीव, राजश्री शंकराजी पंडित राजाज्ञा व संताजी धनाजी जाऊन लढाई करुन चार हजार घोडी व हत्ती आठ पाडाव झाले. सर्जाखान पाडाव झाला. लाख रुपये खंडणी घेतली आणि सोडला." [१३]

सन १६९३ मध्ये परत मोगलांनी पन्हाळ्यास वेढा घातला. तो उठविण्याकरता रामचंद्रपंताने माणकोजी, हिरोजी, बापुजी प्रतापजी, साठम इत्यादी सरदाराबरोबर सैन्य देऊन पाठवले. यावेळी कित्येक प्रांत , किल्ले, मोगल मराठ्यांच्या ताब्यात जात व येत असत " कार्तिकमासी (ऑक्टोबर नोव्हेंबर १६९३ ) राजश्री रामचंद्रपंत अमात्य व राजश्री शंकराजीपंत सचीव व धनाजी जाधव राउ यानी जाऊन पन्हाळ्याचा वेढा उठविला ." [१४]

रामचंद्रपंतानी राजाराम महाराज जिंजीला असताना अतिशय चांगल्या रितीने राज्य सांभाळले असे अनेक इतिहासकारानी म्हटले आहे पण हा वादाचा मुद्दा वाटतो. " स्वत: लढाया व लुटी करुन राज्य रक्षिले व वाढविले आणि आपले पक्षास इतके सामर्थ्य आणिले की, त्यास स्वत:चे मुलखाचे संरक्षण करता येऊन चंदिकडे ही मदत पाठविली इ.स. १६९३ मध्ये संताजी घोरपडे याने चंदी जवळ मोगल सैन्याचा चांगलाच पराभव केला." [१५]

या कालखंडात पंतानी स्वत:च्या अधिकारात अनेक देणग्या दिल्या, वतने दिली व स्वत:च्या नावावर सुध्दा अनेक वतने घेतली. संताजी घोरपडे यानी मिरज

प्रांत मोगलापासून घेतला या करिता रामचंद्रपंताने त्यास त्या प्रांताची देशमुखी दिली." १६

इ.स. १६९४ । ९५ मध्ये राजारामने आबाजी सोनदेव यांचे नावे गडकिल्ल्याचे मामल्याचे काम रामचंद्रपंताकडे हुकुमाने चालविण्याची आज्ञा केली. रामचंद्रपंत अमात्य आपल्या प्रदेशाचे संरक्षण करत होता व जिंजीला काही प्रमाणावर मदत पाठवत होता. पण झुल्फिकारखाने जिंजीला घातलेला वेढा कांही केल्या उठेना. मोगलांचा उपद्रव होऊ लागला. म्हणून राजाराम महाराजांनी गुप्तरुपाने जिंजीला महाराष्ट्राकडे जाण्याचा विचार केला, "आता या ठिकाणी राहून आपला निभाव लागणार नाही, आपण देशी जावे तिकडे रामचंद्रपंत बेलाग असे किल्ले व फौज बाळगून आहे." १७

या विषयी बेन्द्रे लिहितात "चंदीवर किल्लेबंद होऊन लढाई देऊन पुरुषार्थ काय करावं ? येथून निघून पुन्हा देशी जावे रामचंद्रपंत फौजा, किल्ले बेलाग राखून आहेत" १८ असा विचार करुन डिसेंबर १६९७ मध्ये राजाराम महाराज गुप्त रुपाने विशाळगडावर येऊन पोहोचले.

राजाराम महाराजांच्या जिंजी वास्तव्याच्या काळात म्हणजे सन १६८९ पासून २६ डिसेंबर १६९७ पर्यंन्त आठ वर्षे रामचंद्रपंत मराठ्यांच्या राज्याचे प्रमुख होते. सर्व सत्ता रामचंद्रपंताच्या हातामध्ये होती व त्या सत्तेचा त्यानी पुरेपूर वापर केला होता. हा कालखंड धामधुमीचा व विस्कळीत पणाचा सततच्या मोहिमांचा असा होता. तरी खुद्द रामचंद्रपंत हा प्रवृत्त्या मुलकी अधिकारी आणि बेंठा मुत्सद्दी होता हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. म्हणून्च धामधुमीतही फौजफाटयाची जमवाजमव, खजिन्याची तरतुद, गडकोटाचे संरक्षण, खासा स्वारींची आणि कबिल्याची हलवाहलव याबाबतीत रामचंद्रपंताला लक्ष घालावे लागले. त्यात आपली चतुराई व कर्तृत्व पणाला लावावे लागले.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## रामचंद्रपंत - हुकूमतपन्हा व अमात्य ( १६९८-१७१६ )

जिंजीहून राजाराम महाराज परत आल्यानंतर त्यानी विश्वास् अशा रामचंद्रपंताच्या कडे सर्व कारभार सोपवला. प्रत्येक निर्णय घेत असताना पंताच्या बरोबर सल्ला मसलत केली. रामचंद्रपंत हुकूमतपन्हा याचे अंगचे कर्तृत्वाने व श्रमाने राज्य रक्षण होऊन आपण इकडे येऊन राहण्यास जागा राहिली, यामुळे राजारामास संतोष होऊन त्याने सर्व कारभाराचे काम त्याजवर सोपवले. "[१९]

जरी सर्व कारभार रामचंद्रपंताच्या मसलतीने चालत असला तरी रामचंद्रपंताना 'हुकूमतपन्हा' या पदापासून संतोष वाटेना कारण राजाराम महाराजांच्या गैरहजेरीत जितका उपयोग होत होता तितका उपयोग आता या पदाचा होईनासा झाला, त्यामुळे ते नाराज झाले आणि त्याच्या कामात उदासिनता आली. म्हणून सन १६९८ मध्ये रामचंद्रपंतास 'हुकूमतपन्हा' हे पद कायम ठेऊन शिवाय अमात्यपद दिले.' [२०]

राजाराम महाराजांच्या नाजुक प्रकृतीमुळे आणि अनेक मोहिमांच्यामध्ये त्यांच्या शरीरावर अधिक्य पडलेल्या श्रमामुळे त्याची प्रकृती सन १७०० मध्ये अधिक्य बिघडली, आणि २ मार्च १७०० रोजी त्यांचा मृत्यु झाला. मृत्यु समयी राजाराममहाराजांनी सर्वांना जवळ बोलावून रामचंद्रपंत अमात्याच्या आज्ञेत वागण्यास सांगितले, ' "तुम्ही थोरल्या महाराजापासून राज्याचे साधनास श्रम साहस करीत आला व करीत आहा. एक एक प्रतिस्पर्धी निर्माण करणारे आहात आमचा तो काल समीप आला याच्या मागे सर्वत्र मिळोन हल्ली करीता तसे करावे म्हणून श्रमास अंतर न करिता शिवाजी महाराज स्फोन येत ते करावे असे म्हणून रामचंद्रपंताचे स्वाधीन सर्वांस केले. "'[२१]

राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर रामचंद्रपंतानी लगेच सर्व सरदाराना पत्रे लिहिली ' "छत्रपती गेले आता राज्यरक्षण करणे तुम्हाकडे या राज्याची लाज आता तुम्ही राखली पाहीजे "[२२] असे सर्व सरदाराना सांगून त्याना मराठी सत्तेस

प्रामाणिक रहाण्यास सांगितले. यानंतरच्या काळात रामचंद्रपंत अमात्यानी केलेली कामगिरी मराठ्यांच्या इतिहासात महत्वाची आहे कारण राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर मराठ्याचे राज्य चालविण्यासाठी छत्रपती घराण्यातील कुणीही तरुण पुरुष राज्यात नव्हता. छ. संभाजीचा मुलगा शाहु हा मोगलाच्या कैदेत होता आणि राज्यकारभार राजारामाची पत्नी ताराबाई हिच्याकडे होता. ताराबाईला राज्यकारभारात मदत करण्याचे महत्वाचे काम रामचंद्रपंताने केले.

याचवेळी मराठ्यांच्या राज्याचे नेतेपद राजारामाचा दासीपुत्र कर्ण याच्याकडे द्यावे असे काही सरदाराचे म्हणणे होते पण रामचंद्रपंताने या गोष्टीला मान्यता दिली नाही. याविषयी ब्रिज किशोर लिहितात ,

> " नेत्यापैकी काही मंडळींना राजाराम महाराजांचा कर्णाकडे झुकणारा कल माहित होता म्हणून त्याचा आदर करण्याची ही त्याची तयारी होती. परंतु स्वभावाने सनातनी असलेल्या रामचंद्र निळकंठांना मात्र याबाबतीत आपले मत तयार करता येणे शक्य नव्हते[२३]"

या कर्णाकडे नेतेपद जाऊ नये म्हणूनच की काय राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर आठच दिवसात १० मार्च १७०० या दिवशी ताराबाई पुत्र शिवाजीचा मंचकारोहण करण्यात आले. नंतर ताराबाईने शिवाजी राजाची मुंज व राज्याभिषेक करण्याचा मानस प्रधान मंडळा समोर व्यक्त केला. रामचंद्रपंत अमात्यानी यास प्रखर विरोध केला. त्यावेळी पंत म्हणाले " शाहू महाराज वीस वर्षाचे असून मोगलांच्या लष्करात आहेत. त्याची मुंज अद्याप झाली नाही ते लवकरच येतील असे बाळ जोशीराव संगमेश्वरकर यांच्या सांगण्यात आहे. यास्तव ते आल्यावर त्याची व याची एकदाच मुंज करावी व ते सत्तारुढ होती व हे उभयंता युवराजपद करतील "[२४]

रामचंद्रपंतांचा हा विरोध ताराबाईंना अजिबात आवडला नाही. त्या म्हणाल्या "ते धनी आणि हे चोर असा अर्थ नाही. याची मुंज आणि राज्याभिषेक अवश्य कर्तव्य आहे"[२५]

ताराबाईंच्या मनात असे बेत उत्पन्न झालेले पाहून रामचंद्रपंतांना अतिशय वाईट वाटले त्यावेळी ते काहीही न बोलता घरी गेले, नंतर ताराबाईंने शंकराजी पंत व परशुरामपंतांना पाठवून त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पंत शंकराजीपंतांना व परशुरामपंतांना म्हणाले, "धनी म्हणतील तसा रुकार देणारा मनुष्य मी नव्हे, तुमच्या सर्वांच्या विचारास आल्यास करावे"[२६]

यावरुन रामचंद्र पंतांचा निग्रही, हट्टी स्वभाव दिसून येतो. त्यानंतर १७०१ मध्ये राजारामपुत्र शिवाजीचा राज्याभिषेक झाला. तेव्हा परशुराम त्रिंबक यास प्रतिनिधिपद दिले आणि नारोशंकर यास सचिवपद दिले. रामचंद्रपंतांच्याकडे 'कुलअखत्यार' होता. परंतु ते ताराबाईंच्या आग्रही स्वभावामुळे झटून काम न करता जेवढयास तेवढे करु लागले "ताराबाईंच्या वर्धत बुध्यात्मक स्त्री स्वभावजन्य अदुरदृष्टीचे आग्रही स्वभावाने त्यास राज्यकारभारात पुष्कळ अडचणी येत."[२७]

त्यानंतर काळातसुध्दा पंत आणि ताराबाई यांच्यात अधुनमधून खटके उडत आजपर्यन्त राजाराम महाराजांच्या जिंजीवासाच्या काळात व राजाराम महाराज आल्यानंतर सुध्दा सर्व सत्ता पंतांच्याकडे होती. पण आता ताराबाईंने आपल्या हातात सत्ता घेतली होती व ती हुकमत गाजवु पहात होती आणि हे रामचंद्रपंतांना पटत नव्हते.

पंतांच्या विरोधी स्वभावामुळे ताराबाईंचा विश्वास पंतांच्या पेक्षा परशुरामपंत प्रतिनिधिवर अधिक बसत होता. परशुरामपंत आणि रामचंद्रपंत याच्यात वैमनस्य होते, त्यामुळे रामचंद्रपंतांनी जो कारभार करावा तो प्रतिनिधिनी ताराबाईंस भलतेच सांगून मोडवावा असे होत होते, त्यामुळे पंतांना खुप राग येत असे.

असे असले तरी पंत काम करीतच राहिले. औरंगजेब बादशहा मराठ्यांचे डोंगरी किल्ले व प्रांत घेत दक्षिणेकडे चालला होता. रामचंद्रपंताने दर एक किल्ल्यास वेढा पडण्यापूर्वी लोक, दारुगोळा, धान्य व इतर सामुग्री यांची बेगमी करुन किल्ला फार दिवस लढेल अशी तजवीज राखत होता. त्याने कोंकण व मावळ भागातून अव्याहतपणे सैन्याची भरती करण्याचे काम चालू ठेवले होते. आपल्या लोकांच्या वेगवेगळ्या टोळ्या करुन शत्रुचा प्रदेश लुटण्याकरता पाठवून द्रव्याची मदत मिळवत होता. रामचंद्रपंताच्या वरील व्यवस्थेमुळे मोगलांना किल्ला घेण्यास बराच काळ लागत होता. बादशहाची शक्ती कमी होत होती. तरी सुध्दा तो किल्ला जिंकल्याचा आनंद मानीत होता, तो दुर जाताच रामचंद्रपंताने गेलेले किल्ले परत घेण्याची योजना करुन त्या कामावर परशुराम त्रिंबक व शंकरजी नारायण यांना नेमले होते.

रामचंद्रपंतांनी ताराबाईच्या काळात प्रामुख्याने बेंठी कामे केली आहेत. सातारा, विशाळगड, या ठिकाणी राहून कारभार व सैन्याच्या हालचालींवर लक्ष ठेवणे व अगदीच कठीण प्रसंग आला तर युध्दावर जाणे हे काम रामचंद्रपंतांनी केले आहे या विषयी सरदेसाई म्हणतात,

> "रामचंद्रपंत शिपाई नव्हते आणि सैन्याच्या मोहिमावर असताना ते स्वतःच्या जागेवरुन ( तळावरुन ) अजिबात इकडे तिकडे जात नसत. मात्र स्वतःच्या हाताखालच्या लोकांना समाधानी ठेवण्याच्या आणि आपल्या आज्ञा पाळायला लावण्याचा अत्यंत दुर्मीळ गुण त्यांच्या मध्ये होता." २८

या काळातील रामचंद्रपंताच्या कामगिरीचे वर्णन भीमसेन सक्सेना ने सुध्दा आपल्या आत्मचरित्रपर ग्रंथात लिहिले आहे. तो म्हणतो, "पण मराठे पुन्हा एक झाले. राजारामाचा मुलगा गादीवर होता त्याचा मुख्य कारभारी रामचंद्रपंडित हा खेळण्याहुन निघाला" २९

यावरुन या काळातील रामचंद्रपंताचे काम किती महत्वाचे होते हे कळून येते. कारभारी म्हणून त्याने अगदी व्यवस्थितपणे काम केले होते पण एक सेनापती, योध्दा, म्हणून त्याने केलेले काम अतिशय कमी आहे. त्याच्याविषयी सरदेसाई म्हणतात, " कोंकणात सिद्दीवर त्याने क्वचित स्वारी केल्याचे आढळते पण रणांगणावर तो जातीने कधी गेला नाही." [30]

अशा रितीने रामचंद्रपंताने मुत्सद्देगिरीने आपल्या लोकांच्याकडून इ.स. १७०५ मध्ये पन्हाळा, पावनगड हे किल्ले घेतले. नंतर त्याने बत्तीस - शिराळ्याच्या ठाण्यास वेढा घातला आणि हल्ले करुन ते ठाणे घेतले. त्या ठिकाणी मोगलाचा फार मोठा नाश झाला. यावेळी पंतांनी परत पन्हाळा हे राजधानीचे ठिकाण केले.

याप्रमाणे रामचंद्रपंताने औरंगजेबाशी चिवटपणे झुंज देऊन मराठ्यांचे राज्य वाचवण्याचा प्रयत्न केला. बादशहा सुध्दा वृध्द झाला होता व हळूहळू त्याच्या मनातसुध्दा निराशेचे उद्गार येत होते अशा निराशमय स्थितीत २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेब बादशहाचा मृत्यु झाला.

सन १७०७ सालापासून मराठ्यांच्या इतिहासातील तिसरे पर्व सुरु होते. सन १७०७ मध्ये कैदेतून मुघल बादशहाने कांही अटींवर छ. शाहुला कैदेतून मुक्त केले. शाहु कैदेतून सुटून खाली दक्षिणेत आपल्या राज्यात आला पण ताराबाईने त्यांना राज्य न देता विरोधाचे धोरण स्वीकारले. ताराबाईने आपल्या सर्व सरदारांना दरबारात बोलावले व दुधभाताचे ताट समोर ठेऊन शपथ घेण्यास सांगितले. यावेळी रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत व सेनापती या सर्व सरदारांनी सुध्दा शपथ घेतली. यावेळी सर्वांच्या मते असे ठरले की " रामचंद्रपंत अमात्यांनी राजधानीत राहून राज्यकारभार पहावा ( मसलत व राजकारण ) व सेनापती व प्रतिनिधी यांची फौज घेऊन लढाईस जावे. " [31]

शाहू दक्षिणेत आल्यानंतर जास्तीत जास्त सरदारांना आपल्याकडे घेण्यासाठी ताराबाई व शाहू याचे प्रयत्न चालू होते. त्या प्रसंगी शिवाजीने रामचंद्रपंत अमात्य व गिरजोजी यादव या दोघांना खेमसावंत यांच्या भेटीस पाठवले व त्याच्याकडून शाहूस मिळणार नाही असे लिहून घेतले.

" खेम सावंत ने त्याची " " माणगाव " येथे भेट घेऊन त्याच्याकडे आपण एकनिष्ठेने वागू व शाहू महाराजास मिळणार नाही असे कबूल केले. " [३२]

खेम सावंताच्या या प्रामाणिकपणा बद्दल करवीरकर छ. शिवाजी राजे यानी २९-२-१७०८ रोजी कुडाळ, बांदे, डिचोली, पेठणे, मणेरी व साखळी हे महाल वतनादाखल दिले होते. " [33]

यावेळी विविध कारणामधुन ताराबाई व रामचंद्रपंत अमात्य यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला होता. परशुरामपंत प्रतिनिधी आणि रामचंद्रपंत याचे वैमनष्य असल्यामुळे कांही वेळा रामचंद्रपंतानी जो कारभार करावा तो प्रतिनिधिंनी ताराबाईस भलतेच सांगून मोडावा असे होत होते. यामुळे रामचंद्रपंताना राग येऊन त्यानी शाहू महाराजांना काही उत्तेजनपर निरोप पाठविला, त्यामुळे ताराबाईनी पंताना रुप्याची बेडी घालून त्यास वसंतगडावर कैदेत ठेवले होते. "' [३४]

याचवेळी झालेल्या खेडच्या युध्दात ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला कारण ताराबाईचे प्रमुख सल्लागार परशुराम त्रिंबक प्रतिनिधी हा शाहूच्या कैदेत होता आणि रामचंद्रपंत ताराबाईच्या कैदेत होता. सचीव शंकराजी नारायणाने व्दिधा मनस्थितीमुळे आत्महत्या केली होती. चिटणीस खंडो बल्लाळ याने शाहूचा पक्ष स्विकारला होता आणि सेनापती धनाजी जाधव शाहूस सामील झाले होते.

अशा ह्या आणिबाणीच्या प्रसंगी ताराबाईला जुन्या राजनिष्ठ सेवकांची गरज भासु लागली. रामचंद्रपंताची मदत व सल्ला मिळाल्यास आपल्याला पुन्हा शाहू सोबत सामना करता येईल असे ताराबाईला वाटु लागले म्हणून त्यानी रामचंद्रपंताची सुटका केली व शिवाजी व संभाजी ह्या दोघांना त्यांच्या मांडीवर बसवून राज्य संरक्षणाची विनंती केली [३५] तेव्हा ते परत अमात्यपदावर आले.

सन १७०९ च्या दरम्यान ताराबाईंनी रामचंद्रपंतांच्या मदतीने रांगणा आणि संभोवतालचा प्रदेश जिंकून घेतला, त्या ठिकाणी राजकुटुंबियांचे रहाण्याचे ठिकाण केले.

सन १७०९-१० मध्ये वाडीच्या सावंतांनी कोल्हापूरच्या घाटाखालील प्रदेशास त्रास दिला म्हणून पंतांनी त्यांच्यावर स्वारी करून त्यांचा प्रदेश जिंकून घेतला. त्यावेळी सावंतांकडून छत्रपतींच्या पायाशी एकनिष्ठ राहीन असा करार केला व त्याचा प्रदेश त्याला परत केला[36]. सन १७११ मध्ये ताराबाईंनी सातारा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी रामचंद्रपंतांस आज्ञापत्रातून सूचना केली होती की, " सातारियास राजश्री कसो त्रिमल आहेत त्याकडे राजकारण करून खल करून घ्यावा[37]." म्हणजेच ताराबाईंनी रामचंद्रपंतांच्या मदतीने सातारासुध्दा जिंकण्याचा प्रयत्न केला होता.

याच कालावधीमध्ये म्हणजे १७१४ मध्ये ताराबाईंची सवत राजसबाई हिने आपला मुलगा संभाजी यास गादीवर बसवले व ताराबाई व शिवाजी यांना अटक केली. या कोल्हापूरच्या राज्यक्रांती मागे रामचंद्रपंतांचा हात असलाच पाहिजे. ११ डिसेंबर १७१४ रोजी गोव्याच्या व्हाईस रॉयने रामचंद्रपंत अमात्यांना एक पत्र पाठवले आहे. त्या पत्राची सुरूवातच त्यांनी " संभाजी राजे यांचे सरदार रामचंद्र पंडित यास[38]" अशी केली आहे. यावरून ह्या सत्तांतरा मागे पंतांचा हात असावा असे वाटते आणि हे सत्तांतराचे कार्य २ ऑगस्ट १७१४ ते २५ सप्टेंबर १७१४ या ५३ दिवसातच झाले असावे " रामचंद्रपंत अमात्यांनी राजसबाईंना विश्वासात घेऊन आणि मग दोघांनी संगनमत करून शिवाजीराजे यांना सत्तेवरून बाजुला सारले व संभाजी राजे याची त्या ठिकाणी स्थापना केली".[39]

या सत्तांतराविषयी बा.प्र.मोडक म्हणतात,

" रामचंद्रपंतांचे ताराबाईस कारभारातून काढून ती व तिची सून भवानीबाई या उभयतांस अटकेत ठेविले आणि राजारामाची कनिष्ठ पत्नी राजसबाई इचा पुत्र संभाजी यास गादीवर बसवून मोठ्या दक्षतेने राज्यकारभार चालवू लागले."[40]

या सर्व विवेचनावरुन या सत्तांतरामागे रामचंद्रपंताचा हात निश्चितच होता हे कळून येते. या सत्तांतरामागे रामचंद्रपंताचा हेतु कोणता होता या बाबतीत मात्र इतिहास काराच्यांत मतभेद आहेत, या विषयी गर्गे म्हणतात "करवीर राज्याचे रक्षण करण्यासाठी रामचंद्रपंताना सत्तांतर घडवून आणण्याखेरीज पर्याय नव्हता" [४१]

कोल्हापूरच्यागादीवर छ.संभाजी राजे आल्यानंतर रामचंद्रपंत संभाजीचा ताबेदार बनला. या कालात म्हणजे १९-१२-१७१५ मध्ये त्यानी 'आज्ञापत्र' हा प्रसिध्द ग्रंथ लिहिला. अर्थात या ग्रंथाच्या निर्मिती विषयी आज अनेक मतभेद आहेत पण तरीसुध्दा हा ग्रंथ रामचंद्रपंतानेच लिहिला आहे असे मानले जाते.

या कोल्हापूरकर छ.संभाजी ने सुध्दा साताऱ्याच्या छ.शाहू बरोबर विरोधाचे धोरण स्विकारले होते. सन १७१५ नंतर शाहू व संभाजी यांच्यामध्ये तीव्र संघर्षाचे प्रसंग निर्माण झाले होते याच वेळी रामचंद्रपंताचे निधन झाले. त्याच्या मृत्युच्या तारखेविषयी मात्र निरनिराळी मते व्यक्त केली जातात. तरी सुध्दा सन १७ फेब्रुवारी १७१६ ते १३ मार्च १७१६ या दरम्यानच रामचंद्रपंताचा मृत्यु झाला असावा.' [४२] त्याची समाधी मात्र पन्हाळगडावर आहे. त्याच्या मृत्युविषयी डॉ. आ.ग. पवार म्हणतात,' रामचंद्र पंताचा मृत्यु एक तर १७१५ सालाच्या शेवटी किंवा १७१६ सालच्या सुरुवातीला झाला असला पाहिजे.' [४३]

## रामचंद्रपंत कार्याचे मूल्यमापन

रामचंद्रपंत अमात्याला मराठी राज्याचा कारभारी म्हणून श्रेय द्यावे लागले कारण रामचंद्रपंताने हातात सत्ता असल्याशिवाय मन:पूर्वक काम केलेले दिसत नाही. शिवाजी व संभाजी या दोघानी त्याचे एकदरीत धोरण ओळखून त्याला अमात्य पदावरुन कमी केले होते. राजारामाच्या काळात मात्र संपूर्ण सत्ता त्याने हातात घेतली तसेच राजारामा नंतर सुध्दा त्याने पूर्ण सत्ता आपल्याकडेच ठेवण्याचा प्रयत्न केलेला होता . म्हणजेच रामचंद्रपंत हा कुशल योध्दा, प्रशासक,सेनापती नव्हता तर तो एक मुत्सद्दी राजकारणी कारभारी होता असे म्हणावे लागेल.

## टीपा

१ रा.म.गोरे, बावडेकर पंत अमात्य हुकूमतपन्हा यांचे वंशवृत्त (प्रकाशनाची माहिती उपलब्ध नाही)पृ.क्र.९

२ खं.चि.मेहेंदळे (संपा.), भारत इतिहास संशोधक मंडळ मासिक वृत्त शके १८३४ (१९१२)पृ.क्र. २१५.

३ शं.ना.जोशी.,ल.म.भिंगारे (संपा.), आज्ञापत्र आणि राजनिती (पुणे :कॉन्टिनेन्टल प्रकाशन १९८० ) पृ.५८,५९.

४ कमल गोखले, शिवपुत्र संभाजी (पुणे: नवकमल प्रकाशन,१९८१) पृ.क्र. ३४०

५ वा.सी.बेन्द्रे, छ.राजाराम महाराज (मुंबई: लोकवाङ्.मय प्रकाशन,१९७५)पृ.क्र.१९.

६ वि.का.राजवाडे(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने (कोल्हापूर : वि.गो.विजापूरकर,१९०३ ) खंड ८वा ले.९९ पृ.क्र.१२५.

७ ज.भा.पवार, महाराणी ताराबाई (कोल्हापूर: ताराराणी विद्यापीठ, प्रकाशन,१९७५ ) पृ.क्र. ३२.

८ बेन्द्रे, तत्रैव - पृ.क्र. २३१.

९ स.मा.गर्गे, करवीर रियासत (पुणे : राणे प्रकाशन,१९८० )पृ.क्र. ३०.

१० गोरे, तत्रैव - पृ.क्र. ४४

११ से.मा.पगडी, इतिहासाचा मागोवा (पुणे :ज्ञानराज प्रकाशन,१९६५)पृ.क्र. ३६.

| | |
|---|---|
| १२ बेन्द्रे , | तत्रैव - पृ.क्र. २३१. |
| १३ बेन्द्रे , | तत्रैव - पृ.क्र. २३४. |
| १४ बेन्द्रे , | तत्रैव - पृ.क्र. २३४. |
| १५ गोरे , | तत्रैव - पृ.क्र. ४८. |
| १६ शं.ह.वर्टीकर(संपा.), | कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे (कोल्हापूर: शं.ह.वर्टीकर प्रकाशन, १९७१) पृ.क्र. १११. |
| १७ गोरे , | तत्रैव - पृ.क्र. ४८. |
| १८ बेन्द्रे , | तत्रैव - पृ.क्र. १६३. |
| १९ गोरे , | तत्रैव - पृ.क्र. ४९. |
| २० | कित्ता - पृ.क्र. ४९. |
| २१ गर्गे , | तत्रैव - पृ.क्र. ५७. |
| २२ | कित्ता - पृ.क्र. ११६ |
| २३ Brij Kishore , | Tara Bai and Her Times, (Bombay: Asia Publishing House, 1963) P. No. 63, Marathi Translation mine. |
| २४ बा.प्र.मोडक , | कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास (प्रकाशनाची माहिती उपलब्ध नाही) पृ.क्र. २०. |
| २५ गोरे , | तत्रैव - पृ.क्र. ५५ . |
| २६ गोरे , | कित्ता - पृ.क्र. ५५. |

२७ गोरे , किल्ला - पृ.क्र.५६.

२८ G.S.Sardesai , New History of the Marathas, (Bombay:D.B.Dhawale 1971) P.N.79, Marathi Translation mine.

२९ गर्गे , तत्रैव - पृ.क्र.७९ .

३० गो.स.सरदेसाई , मराठी रियासत स्थिरबुध्दी राजाराम (र.वि.हेरवाडकर काव्येतिहास संग्रह ६, व्हिनस प्रकाशन ) पृ.क्र.९१.

३१ मोडक , तत्रैव - पृ.क्र. २३.

३२ स.मा.गर्गे , ` महाराणी ताराबाई` मराठ्यांचा इतिहास अ.रा.कुलकर्णी आणि ग.ह.खरे (संपा.) (म.वि.ग्र.नि.मंडळ प्रकाशन,१९८५) खंड रा, पृ.क्र.१५५-५६.

३३ के.गो.सबनीस(संपा.), पंत अमात्य बावडा दप्तर , (गगनबावडा,सेक्रेटरी ज.बावडा १९३७) भाग पहिला प.क्र.७१,पृ.क्र.१३८.

३४ गर्गे , तत्रैव - पृ.क्र.११८.

३५ किल्ला - पृ.क्र.९९.

३६ गोरे , तत्रैव - पृ.क्र.७२.

३७ राजवाडे , तत्रैव - पृ.क्र.८८.

३८ स.मा.गर्गे, , `छत्रपतिची धाकटी पत्नी` अ.रा.कुलकर्णी आणि ग.ह.खरे (संपा.)` मराठ्यांचा इतिहास` (नागपूर : म.वि.ग्र.वि.मंडळ १९८५) खंड रा, पृ.क्र.१७२.

३९ स.मा.गर्गे , करवीर रियासत
(पुणे: राणे प्रकाशन १९८० ) पृ.क्र.१५०.

४० मोटक , तत्रैव - पृ.क्र.२६.

४१ स.मा.गर्गे , छत्रपतींची धाकटी पाती ,अ.रा.कुलकर्णी
आणि ग.ह.खरे (संपा.)
मराठ्यांचा इतिहास, खंड २रा,पृ.क्र.१७३.

४२ स.मा.गर्गे , करवीर रियासत
(पुणे: राणे प्रकाशन १९८०) पृ.क्र.१६२.

४३ A.G.Pawar , Studies in Maratha History,
(Kolhapur:Shivaji University,
Publication )
Vol.I,P.No.183,
Marathi Translation mine.

••

# १) रामचंद्रपंत अमात्य यांचे सत्तेचे राज्यकारण

## रामचंद्र पंत अमात्यांचे सत्तेचे राजकारण

मराठ्यांच्या राज्याच्या दृष्टीने रामचंद्रपंत अमात्याने जी कांही कामगिरी केली आहे ती महत्वाची आहेत. पण तरी रामचंद्रपंताच्या या कामगिरीमध्ये त्यांचा स्वार्थी दृष्टीकोन आढळून येतो. त्यांचा हा स्वार्थ सर्व बाबतीमध्ये आहे. उदा.सत्ता, वतने, पैसा इत्यादी या सर्व बाबतीत पंतानी स्वार्थी राजकारण केले आहे. अगदी सुरुवातीच्या काळापासून पाहिले तर ही गोष्ट स्पष्ट होईल. म्हणजे रामचंद्रपंत मुत्सद्दी होता. पण ही सर्व मुत्सद्देगिरी त्याने स्वत:कडे पैसा कसा येईल, स्वत:कडे सत्ता कशी राहिल, वतने कशी मिळवता येतील यासाठी वापरली. सुरुवातीला आपण रामचंद्रपंत स्वत:कडे सत्ता टिकविण्याचा प्रयत्न कसा केला ते पाहू.

इ.स.१६६५ मध्ये निळोपंताची कामगिरी बघून त्यांचा पुत्र रामचंद्रपंत यास नवीन बसविलेल्या सिंधुदुर्गाची वतनी सबनीसी दिली आणि मुतालिकाकडून काम करुन घेण्यास सांगितले. म्हणजेच १६६६ पासून रामचंद्रपंताकडे थोडे थोडे सत्तेचे अधिकार येण्यास सुरुवात झाली. सन १३ एप्रिल १६६८ रोजी जंजीरे किल्ल्याचा हवालदार रायाजी भोसले खालील पत्र शिवाजी महाराजांना दिले.

"... रामचंद्र निळकंठ यास जंजिरे मजकूरीची बसनीसी दिली आहे... माईले आपण मुतालिक जंजिरे मजकुरास पाठवून देतील त्याचे हाते सबनीसिचा कारभार घेत जाणे..."[१]

इ.स.१६७२ मध्ये अचानक रामचंद्रपंताचे वडील निळो सोनदेव यांचा मृत्यू झाला. रामचंद्रपंताचे मोठे भाऊ नारोपंत हे मुजुमदारीचे काम पाहू लागले.पण राज्याभिषेकाचे वेळी मात्र अमात्यपद रामचंद्रपंताना दिले गेले. याची कारणे अनेक इतिहासकारानी वेगवेगळी दिली आहेत त्याच्या मनस्थिती विषयी गोरे म्हणतात,

".. याच्या मनाची प्रवृत्ती प्रपंचापेक्षाही परमार्थाकडे फार होती.यांनी आपले लग्नही करुन घेतले नाही ... यांची विरक्त स्थिती पाहून शिवाजी या हुद्यासंबंधाचे सर्व काम यांचे कनिष्ठ बंधू रामचंद्रपंत यांचे हातून घेऊ लागला."[२]

या नारोपंता विषयी जोशी, भिंगारे यांनी संपादीत केलेल्या आज्ञापत्राच्या प्रस्तावणेमध्ये खालील सभासदांच्या वाक्यांचा उल्लेख केला आहे. `.. त्यास वडील पुत्र नारोपंत, ते काही शहाणे नाहीत, रामचंद्र धाकटे, तो शहाणा राज्याचा लोभ धरील की हा दैवाचा भाग्यवंत, बापापेक्षा लक्षगुणी श्रेष्ठ होईल.` [3]

इतिहासकारांनी अशा रीतीने रामचंद्रपंताचा भाऊ नारोपंत यास वेडा ठरवून तो अमात्यपद सांभाळण्यास लायक नसल्याचे सांगितले आहे. पण खरी गोष्ट अशी की, नारोपंत हा धार्मिक जरूर होता पण वेडसर अजिबात नव्हता. त्यासंबंधी पुरावे आपणास पहाण्यास मिळतात. या उलट रामचंद्रपंत मात्र मुत्सद्दी व थोडा कार्यशील होता. त्यांने महाराजांच्या जवळ राहून त्यांची मर्जी सांभाळून व गोड बोलून आपले स्थान निर्माण केले होते व अमात्यपद आपल्याकडे घेतले होते.

"रामचंद्रपंत हा मोठा मुत्सद्दी,अनेकांची मर्जी सांभाळून त्यास कार्यप्रवण करणारा दुरदर्शी, शांत वृत्तीचा होता." [4] असे स.मा.गर्गे म्हणतात यामधील `अनेकांची मर्जी सांभाळून` हा शब्द महत्वाचा आहे. यावरुन रामचंद्रपंताने महाराजांची मर्जी सांभाळून हे अमात्यपद मिळवले होते असे दिसते. आता नारोपंताविषयी पाहू या. नारोपंत हे हुषार,मुत्सद्दी व मराठा छत्रपतींचे विश्वासू सेवक होते, हे पुढील उल्लेखावरुन दिसून येईल.

`फेब्रुवारी १६८९ मध्ये छ. संभाजी महाराजांनी जेव्हा मोगलांनी नावडी येथे पकडले, त्यावेळी महाराजांबरोबर असलेल्या मंडळीची वाताहत झाली. या गडबडीत मराठी राज्याचे एक मुत्सद्दी `नारोपंत अमात्य` हे संगमेश्वराहून रायगडावर परत येत असता, चोरट्यानी त्यांना पेढांबे या गावी लुटले. ती हकीकत त्यांनी रायगडावर येऊन सांगितल्यावर छत्रपती राजारामानी त्या चोरट्यांना व नारोपंताचा लुटला चीजवस्तुंचा तपास करण्यासाठी आपल्या खंडोजी गाडे ह्या अधिकाऱ्यास पाठविले.` [5]

यावरून नारोपंत हा वेडा नसून मराठ्यांच्या छत्रपतींचा विश्वासू सेवक व मुत्सद्दी होता हे कळते. राजाराम महाराजांनी खंडोजी गाडे सारख्या अधिकाऱ्यास त्याच्या तपासासाठी पाठवले होते यावरून कळते. पुढे राजाराम महाराजांनी रायगड किल्ल्यावरील रत्नशाला प्रमुखांना बहिरजी नाईक घाटगे यांना पत्र पाठवून नारोपंत अमात्यांच्या वस्तु परत देण्यास सांगितले आहे.

'... राजश्री नारोपंत अमात्य यांच्या वस्ता संगमेश्वरीहून रायगडास जात असता मौ.पेडाबें ता. चिपोलण येथे दांडगियाणी लुटला. त्याची राजापुर्सी करायासि खंडोजी गाडे हुजरून पाठविला. त्याने वस्ता सापडिल्या त्या हुजुर आणिल्या. त्या ... सदरहू साने रायगडी रत्नाशालेकडून पंतमानईलेस प्रविष्ट करणे येविषयी'...[६]

या पत्रावरून निश्चितच वाटते की, नारोपंत हा छत्रपतीचा एक निष्ठावंत सेवक असला पाहिजे. कारण लुटारू व लुटल्या गेलेल्या वस्तू शोधण्यासाठी खंडोजी गाडे या अधिकाऱ्यास नेमले व त्या वस्तु सापडल्या नंतर त्या वस्तु नारोपंताना द्याव्यात असे पत्र सुध्दा राजाराम महाराजांनी लिहिले आहे. नारोपंताच्या छत्रपतींच्या निष्ठेविषयी या ठिकाणी आणखी एक उल्लेख महत्वाचा वाटतो. रियासतकार सरदेसाई म्हणतात, 'जून १७०८ मध्ये शाहूने पन्हाळ्याकडे कूच केले. तेव्हा ताराबाईने पन्हाळा सोडून रांगण्यावर गेली. ताराबाईने रांगण्यावरून खेम सावंत व कान्होजी आंग्रे यास मदतीस बोलावले. रामचंद्र निळकंठाचा भाऊ नारोपंतही तिला मिळाला'.[७]

यावरून नारोपंत सुध्दा इतर सरदाराच्या तोडीचा एक सरदार होता आणि अडचणीच्या वेळी त्याने ताराबाईला मदत केली आणि शिवाजी, संभाजी, राजाराम, ताराबाई यांच्यावर त्यांची निष्ठा होती हे स्पष्ट होते. वरील पत्राच्या उल्लेखावरून नारोपंत संभाजीच्या लष्करामध्ये असण्याचा संभव वाटतो. एवढेच नव्हे तर शाहू दक्षिणेत आल्यानंतर नारोपंताने आपल्याला अमात्यपद मिळावे या हेतूने शाहू बरोबर पत्रव्यवहार सुध्दा केला.

'... नारो निळकंठ हुशारीत कमी होता. पण अमात्य पदाच्या लालसेने त्याने शाहूकडे पुष्कळ खटपट केली. रामचंद्रपंतानेही शाहूकडे असा संदर्भ केला.' [8]

नारोपंताने गिरगोजी पिसाळामार्फत शाहू महाराजांना पत्र पाठवले व पराक्रमाची कामे करण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. याच प्रमाणे आपले बंधु रामचंद्रपंत आपणास ' सिंधुदुर्ग ' येथे राहण्यास आग्रह धरत आहेत अशी तक्रार केली. या नंतर छ.शाहू महाराजांनी नारोपंतांना पत्र पाठवून आपणास भेटणेस बोलावले.

' ... आपणास बंधुचा आग्रह सिंधुदुर्गास जावे व तेथोन आमंत्रणाही सापेक्षायुक्त आले आहे ... यावरुन तुमचे निष्ठेचा अर्थ कळोन स्वामी संतोषी जाहले .. गिरगोजी पिसाळाकडील माणसे तुम्हास बोलवावयास पाठविले आहेत. तुम्ही स्वार होऊन अविलंबे दर्शनास येणे ...' [9]

यावरुन ' नारोपंत ' कोल्हापूरच्या राज्यात राहू नये, तो सिंधुदुर्गास जाऊन रहावा किंवा सातारकर छत्रपतीकडे जाऊन राहावा व आपणास अमात्यपद उपभोगता यावे असा रामचंद्रपंताचा हेतु असावा. पण रामचंद्रपंताने नारोपंताची सातारकर छ.शाहूची भेटच घेऊ दिली नाही व नारोपंताचे अमात्य होण्याचे स्वप्न अर्धवटच राहिले हे पुढील उल्लेखावरुन कळून येईल.

'... हे वर्तमान रामचंद्रपंतास समजून त्यास शिवाजीचे भेटिस बोलाविले असावे किंवा शाहूकडे जाण्यास प्रतिबंद केला असावा...' [10]

यावरुन असे स्पष्ट होते की, रामचंद्रपंताने आपल्या स्वार्थी सत्तेच्या स्पर्धेत आपल्या थोरल्या बंधुस म्हणजे नारोपंतास कुजवले आहे. रामचंद्रपंताने फक्त नारोपंतानाच मागे ठेवले होते असे नाही तर आपले चुलते ' आबाजी सोनदेव ' यांना सुध्दा राजकीय सत्तास्पर्धेत मागे ठेवले होते. वास्तविक आबाजी सोनदेव व निळो सोनदेव व या दोघांनीही शिवाजीच्या अनेक कामगिऱ्या पार पाडल्या होत्या. त्यामुळे निळो सोनदेवा नंतर अमात्यपद वास्तविक आबाजी सोनदेवास मिळणे आवश्यक होते पण तसे न होता ते रामचंद्रपंतास मिळाले.

निळोपंत काम करु लागल्यापासून त्याला त्याचा भाऊ आबाजी सोनदेव कामात मदत करत होता. १६४८ मध्ये शिवाजी महाराजांनी कल्याण प्रांत जिंकण्याची जबाबदारी आबाजी सोनदेवावर टाकली होती. ती त्याने व्यवस्थित पार पाडली होती. त्यामुळे महाराजांनी त्यास त्या कल्याण प्रांताचा सुभेदार म्हणून नेमले. गोरे म्हणतात "१६५० मध्ये आबाजीने कर्नाटक मोहीम यशस्वी केली. १६६० मध्ये कल्याण भिवंडी व संपूर्ण कोंकणावर आबाजीने वर्चस्व निर्माण केले होते." इ.स. १६६२ । ६३ च्या सुमारास शिवाजीचे ताब्यात असलेल्या मुलखापैकी सुमारे १।२ भाग एकट्या आबाजी पंताने जिंकला होता."[११]

म्हणजेच शिवाजी महाराजांच्या काळात आबाजी सोनदेवाने पराक्रमाने बराच मुलख आपल्या ताब्यात घेतला होता. वा.सी.बेन्द्रे च्या मते निळोपंताच्या मृत्युनंतर आबाजी सोनदेवाकडे मजमुचा कारभार असावा. "२६ में ला आबाजी पंडितास सरकारकून म्हणून पांमत्या ऑक्सिडनने दिल्याचा उल्लेख आहे."[१२]

राजाराम महाराजांच्या काळात सुध्दा आबाजी सोनदेवाने अतिशय महत्वपूर्ण जबाबदारी पूर्ण केली होती. राजारामाच्या काळात आबाजी सोनदेवाने रायगड जिंकण्याचा प्रयत्न केला होता किंवा रायगड जिंकण्यास राजाराम महाराजांनी सांगितले होते.

"राजाराम महाराजांनी आपला विश्वासू सरदार आबाजी सोनदेव याला जिंजीहून महाराष्ट्राला पाठवले आणि आपल्या इतर सरदारांना तसेच रामचंद्रपंत अमात्य हुकूमतपन्हा यांना मदत करण्याची विनंती केली."[१३]

यावरुन राजाराम महाराजांच्या काळात सुध्दा आबाजी सोनदेव एक विश्वासू अधिकारी होता. त्यास जिंजीहून महाराष्ट्रामध्ये रायगड जिंकण्यासाठी पाठवले होते व सर्व सरदारांना व रामचंद्रपंत अमात्य यांना सुध्दा मदत करण्यास सांगितले होते. या विषयी राजाराम महाराजांचे जाऊळकर, व दरेकर कासुर्डे यांना पाठवलेले आज्ञापत्र महत्वाचे आहे, त्यामध्ये महाराज म्हणतात ,

"... पूर्वी कै. स्वामीचे वेळेस तुम्ही लोकीं कष्ट मेहनत करून थोर थोर कामे करून दिलीं आहेत. सांप्रत, रायगड हस्तगत करून घेणे हे कार्य बहुतच थोर आहे. येविसी रामचंद्र पंडित यांनी तुम्हास सांगितले आहे, त्यावरून तुम्ही गड हस्तगत करून घ्यावयाच्या यत्नात आहा. सांप्रत स्वामींनी रा.आबाजी सोनदेव यांसी पाठवले आहे..." [१४]

यावरून राजाराम महाराजांच्या काळात आबाजी सोनदेव हा एक विश्वासू अधिकारी होता व रामचंद्रपंतापेक्षा जास्त विश्वास त्यांच्यावर होता हे कळते. याचवेळी आपण आता रामचंद्रपंताची माहिती बघू.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीला वगळून राजारामाला गादीवर बसवून आपल्याकडे सचिव पद घेण्याचा प्रयत्न रामचंद्रपंताने केला होता म्हणजे रामचंद्रपंत सुरुवातीपासूनच सत्तेच्या पाठीमागे होता.

"प्रल्हाद निराजी व रामचंद्रपंत यांनी राजारामला गादीवर बसवण्याचा प्रयत्न केला आणि अनुक्रमे प्रतिनिधी आणि सचिवपद आपल्याकडे घेतले." [१५]

यावरून रामचंद्रपंत मुत्सद्देगिरीने सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करत होता हे दिसते. हाच मुद्दा पुढे पाहू या . छ. संभाजी महाराजांच्या वधानंतर औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करत होता. तो राजाराम महाराजांच्या मागे होता. यावेळी राजाराम महाराजांनी सर्व मंत्रिमंडळाची बैठक बोलवून सर्वांना परिस्थिती समजाऊन सांगितली व उपाय सुचवण्यास सांगितले. त्यावेळी रामचंद्रपंताने सर्वांच्या विचाराने ठरवले की, महाराज ह्या प्रांतात राहून चालणार नाही. तेव्हा त्यांनी दूर कर्नाटक प्रांतात जावे. यावेळी रामचंद्रपंतानी ज्योतिष्याकडून मुहूर्त काढून आणून महाराजांची चंदीला रवानगी केली.

> "... रामचंद्रपंताने बाळजोशी याजकडून मुहूर्त आणवून चतुर व होतकरू अशा प्रल्हादपंतास सर्व मुत्सद्दी व सरदार यास राजारामा बरोबर देऊन वाटेने उघडकीस येणार नाही असे जाण्यास सांगून त्यांची चंदीस रवानगी केली." [१६]

"राजाराम महाराजांना रामचंद्रपंताने जिंजीला पाठवले हे तर उघडच आहे. पण त्या बरोबर सर्व सत्ता त्याने आपल्या हातात घेतली. अर्थात राजाराम महाराजांना जिंजीला पाठवणे व सत्ता आपल्या हातात घेणे हे रामचंद्रपंताचेच नाटक असावे असे वाटते.

राजाराम महाराजांच्या जिंजीवासाच्या काळात राज्याची पूर्ण सत्ता पंतांच्याकडे होती. "हुकुमतपन्हा" हा हुद्दा त्यांना राजाराम महाराजांनी दिला होता. हुकुमतपन्हा याचा अर्थ छत्रपतींनी सुध्दा त्यांच्या आज्ञा पाळाव्यात असा होता. रामचंद्र निळकंठ यास "हुकुमतपन्हा" किताबत दिली परंतु ते हुकुम जे करतील ते छत्रपतींनी (ही ) मोडू नयेत असे केले."[१७] या काळात सत्तेचे सर्व अधिकार यांना उपभोगिले होते. अनेक नवीन वतने आपल्या नावावर घेतली होती.अनेकांना नवीन वेतने दिली होती. पण राज्यकारभार मात्र व्यवस्थित केलेला नव्हता. परिस्थिती अतिशय बिकट बनलेली होती. म्हणून राजाराम महाराजांनी पंधरा हजार घोडदळ, पंचवीस हजार पायदळ व एक लाख होनाचा खजिना पाठवला होता.

".. छत्रपतींनी कर्नाटकात चाळीस हजार घोडदळ आणि पंचवीस हजार पायदळ उभारले असून केसो त्रिमल बरोबर पंधरा हजार घोडदळ व पंचवीस हजार पायदळ आणि एक लाख होनाचा खजिना देऊन त्यास महाराष्ट्रात पाठवले आहे." [१८]

यावरून रामचंद्रपंताना महाराष्ट्रातील कारभार व्यवस्थित करता आला नव्हता. म्हणून राजाराम महाराजांनी जिंजीच्या बंदीवासात असून सुध्दा कर्नाटकातून मदत पाठविली होती ही मदत १६९० च्या सुरुवातीसच पाठवली होती. या विषयी आणखी सुध्दा उल्लेख आहे.

"या प्रांती वर्तमान तर रा.छत्रपती स्वामी स्वारी करून कर्नाटक प्रांती गेले यावरी, तिकडे जमवा जमव लष्कर चाळीस हजार व हशम एक लाख पंचवीस हजार जमाव जाहला आहे ... पुढे तूर्त राजश्री केसो त्रिमल या प्रांती रवाना केले आहेती. त्या बरोबर संगीनस्वार पंधरा हजार व हशम पंचवीस हजार देऊन रवाना केले आहेत ... खाजानाही एक लाख आहे..." [१९]

राजाराम महाराजांच्या अनुपस्थितीत रामचंद्रपंताना राज्यकारभार व्यवस्थित करणे जमत नव्हते. त्यामुळे वारंवार विनंतीपत्रे पाठवून रामचंद्रपंत मदत मागवून घेत होता हे पुढील एका उल्लेखावरून कळून येईल.

" राजाराम महाराज जिंजीला गेले. त्यांच्या सोबत संरक्षणाकरता एकंदर बत्तीस सरदार गेले. त्यात संताजीराव घोरपडे व विठोजीराव चव्हाण होते. इ.स. १६९१ च्या सुमारास उभयंता महाराष्ट्रात रामचंद्रपंताच्या मदतीस आले"[२०]. हे सरदार बरेच वेळा जिंजी ते महाराष्ट्र अशा फेऱ्या करीत व दोन्ही ठिकाणी राजारामला व रामचंद्रपंताला मदत करीत. त्यांच्या महान कार्यशक्तीवरच खऱ्या अर्थाने मराठ्यांचा लढा चालू होता या कार्याचे श्रेय मात्र या शूर कर्तबगार सरदारांना न मिळता केवळ मुत्सद्दी असलेल्या रामचंद्रपंतास देण्याचा खटाटोप काही इतिहासकार करतात असे म्हणावेसे वाटते.

जिंजीहून संताजी, धनाजी, विठोजी चव्हाण व इतर मदत आल्यानंतरच रामचंद्रपंताने पन्हाळ्यावर मोहीम आखली आहे किंवा पन्हाळा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

> " ऑक्टोबर १६९३ मध्ये धनाजी जाधव जिंजीहून परत आले होते. त्यांनी रामचंद्रपंत व शंकराजी नारायण सचिव हे मोठे सैन्य पन्हाळ्याच्या मदतीला आले."[२१]

म्हणजेच या काळात रामचंद्रपंताने कोणत्याही प्रकारचा चांगला राज्यकारभार केलेला नाही. फक्त सत्ता आपल्याकडे ठेऊन सत्ता उपभोगण्याचे काम केलेले आहे. रामचंद्रपंताविषयीच्या अनेक तक्रारी ऐकून अनेक लोक जिंजीपर्यन्त जात होते म्हणून १६९४ मध्ये छ.राजाराम महाराजांनी किल्ल्यांचा कारभार आबाजी सोनदेव यांच्याकडे सोपवलेला दिसून येतो. त्या पत्रामध्ये ते म्हणतात, " तीर्थस्वरूप के. स्वामींचे वेळेपासून थोर थोर कार्यभाग करीत आले आहात. तुम्हास हा मामला सांगितल्याने यथासांग होऊन येईल ऐसे जाणोन तुमावरी स्वामी कृपाळु होऊन किले हायचा मामला सांगितला आहे."[२२]

आबाजी सोनदेवाना ज्या अर्थी किल्ल्याचा कारभार राजाराम महाराजांनी दिला त्या अर्थी निश्चितच रामचंद्रपंताने राजाराम महाराजांच्या अनुपस्थितीत राज्यकारभार व्यवस्थित केला नसणार. पुढे राजाराम महाराज जिंजीहून परत आले त्यावेळी तर राज्याची परिस्थिती अतिशय बिकट बनलेली होती. पैशाचे पाठबळ नव्हते. सैन्य मोगलांच्या सेवा चाकरीत होते. या गंभीर परिस्थितीतून कोणती तोड काढावी ते महाराजांना समजत नव्हते. यावेळी रामचंद्रपंत अमात्य व दादो मल्हार यांनी महाराजांना परत कर्नाटकात जाण्याचा सल्ला दिला. ` महाराजांनी परत कर्नाटकात जावे व फौज फारा जमवावा.. ` [२३] म्हणजेच रामचंद्रपंताने राजाराम महाराजांना जिंजीला पाठवले, सत्ता हातात घेतली व राजाराम महाराज परत आल्यानंतर त्यांना परत जिंजीला जाण्याचा सल्ला दिला. यावरून रामचंद्रपंताला आपल्या हातात सत्ता राहावी असे वाटत असावे हे दिसून येते. जिंजीला जाण्याचा सल्ला राजाराम महाराजांना आवडला नाही. शिवाय पंताचा कारभार व्यवस्थित नसल्याने महाराजांनी रामचंद्रपंतानाच जिंजीला पाठवल्याचे दिसते हे पत्र राजापूरच्या अधिकाऱ्यास राजाराम महाराजांनी ५ नोव्हेंबर १७०१ रोजी पाठवले आहे.

> ` . सांप्रत स्वामी कर्नाटक प्रांतीहून परतोन या प्रांते आले. प्रसंगी रा.रामचंद्र पंडित अमात्य यांनी त्या प्रांते पाठवावे ऐसा विचार जाहला ...या रामचंद्र पंडित अमात्य यासी त्या प्रांताचा मखत्यार देऊन पाठविले आहे. तरी तुम्ही त्याचे आज्ञेत राहून वर्तणूक करीत जाणे..` [२४]

राजाराम महाराज जिंजीहून परत आले. त्यावेळी सर्व कारभार रामचंद्रपंताच्याकडेच होता. महाराजांनी सुध्दा पंताच्या बरोबर सल्लामसलत करूनच राज्यकारभार सुरू केला होता. पण यामध्ये रामचंद्रपंत नाखुश दिसत होते. कारण राजाराम महाराज असल्यामुळे ` हुकुमतपन्हा ` या पदाचा म्हणावा तितका उपयोग होत नव्हता. `` रामचंद्र निळकंठ हे पूर्वीप्रमाणे कामकाज करीत पण आजूर्दीपणाने वागत `` [२५] असे वा.सी.बेन्द्रे म्हणतात.

यावरून राजाराम महाराज असल्यामुळे पंतांना कामात रस वाटत नव्हता व पूर्वीप्रमाणे झटून काम करत नव्हते. त्यांना 'हुकुमतपन्हा' हे पद कमी महत्वाचे वाटत होते हे कळते.

> 'राजा जवळ असता 'हुकुमतपन्हा' किंवा प्रतिनिधी सारखी पदे कार्यकर्त्या व तेजस्वी पुरुषास निरुपयोगी वाटावी यात काही आश्चर्य नाही असे रामचंद्रपंतास वाटून त्यास उदासिनता आली...' [२६]

या वरून पंतांना सत्तेचा हाव होती हे स्पष्ट होते. हे राजाराम महाराजांना कळले व त्यानी 'खंडोबल्लाळ' बरोबर चर्चा करून रामचंद्रपंतांना हुकुमतपन्हा हे पद कायम ठेऊन परत अमात्यपद दिले. "यापुढे रामचंद्रपंत या दोन्ही पदांची कामे झटून व हुषारीने करू लागले." [२७]

म्हणजेच हातात सत्ता आल्यानंतर रामचंद्रपंत परत झपाट्याने काम करत असल्याचे दिसते. पुढे २ मार्च १७०० रोजी राजाराम महाराजांचा मृत्यु झाला आणि राज्याच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला. मराठी राज्याचा सांभाळ करू शकेल असा कुणीही छत्रपती घराण्यातील पुरुष माणूस राज्यात नव्हता. कारण संभाजीपुत्र शाहू हा मोगलांच्या कैदेत होता. मात्र याच वेळी राजाराम महाराजांचा दासीपुत्र 'कर्ण' हा राज्य सांभाळू शकला असता. राज्यातील काही सरदारानी सुध्दा त्याला पाठींबा दिला होता. राजाराम महाराजांचा सुध्दा त्याच्याकडे काही प्रमाणात ओढा होता असे दिसते. पण सत्ताभिलाषी, प्रतिगामी, रामचंद्रपंतास हे आवडले नाही, त्याने कर्ण चा गादीवरून अधिकार डावलून टाकला हे ब्रिज किशोरच्या पुढील विधानावरून कळेल.

> ' "नेत्यानं पैकी कांही मंडळींना राजाराम महाराजांचा कर्णाकडे झुकणारा कल माहित होता. म्हणून त्याचा आदर करण्याची ही त्याची तयारी होती. परंतु स्वभावाने सनातनी असलेल्या रामचंद्र निळकंठाना मात्र या बाबतीत आपले मत तयार करता येणे शक्य नव्हते." [२८]

7566
A

यावरून पंतांना आपल्या हातात सत्ता असावी असे वाटत असावे हे कळून येते. या सत्तालोभी वृत्तीचा हक्क तर डावललाच शिवाय ताराबाईने ज्यावेळी आपला पुत्र शिवाजीच्या राज्याभिषेकाचा विचार मांडला त्यावेळी त्यास कसून विरोध केला. अर्थात हा विरोध स्वार्थी दृष्टिकोनातूनच होता. ताराबाईने हा विरोध मानला नाही व तिने आपला मुलगा शिवाजी याचा राज्याभिषेक करून त्यास कोल्हापूरच्या गादीवर बसवले. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवण्यास हरकत नाही की राजाराम जिवंत असेपर्यन्त ताराबाई व रामचंद्रपंत यांच्यात कोणत्याही प्रकारचा संघर्ष नव्हता पण सत्तेच्या स्पर्धेत रामचंद्रपंत आणि ताराबाई या दोघांचा संघर्ष सुरू झाल्याचे दिसते.

> "रामचंद्र निळकंठ आणि ताराबाई यांच्या मध्ये राजाराम महाराजांच्या मृत्युपर्यन्त फारसे मतभेद नव्हते. मात्र त्या नंतर वारसा हक्काच्या प्रश्नावरून मतभेद सुरू झाले." २९

ताराबाई सुध्दा स्वार्थी व सत्ता लालसी स्त्री होती. त्यामुळे रामचंद्रपंत व ताराराणी यांच्यात नेहमी संघर्ष होत होता. आज पर्यन्त पंतांनी अमर्याद सत्ता उपभोगली होती. राजाराम महाराजांच्या जिंजी वासाच्या काळात व राजाराम आत्यानंतर सुध्दा सर्व सत्ता पंतांच्याकडे होती पण आता ताराबाई आपल्या हातात सत्ता घेऊन हुकूमत गाजवू पहात होती व हे रामचंद्रपंतांना आवडत नव्हते. सत्तेची सूत्रे आपल्या हातातून जातात की काय अशी भिती पंतांना वाटत होती. दोघांच्या मनात एकमेकाबद्दल शंका होती. सत्ता आपल्या हातात रहावी असे दोघांना वाटत होते. ३१ मार्च      रोजी ताराबाईने रामचंद्र पंतांना पाठविलेल्या पत्रावरून हे स्पष्टपणे दिसून येईल,

> "तुम्ही घडी घडी मनात संदेह निर्माण करावा हे उचित नाही. येविशी साहेबी दंडदंड सांगितले अगर लिहिले ते तुम्हास प्रमाण वाटते ऐसे नाही. या उपरी निसंदेह होऊन राज्याभिवृध्दीस प्रवार्चेन संतोष पावणे. राज्यभार तुम्हावरी टाकला आहे." ३०

संशयाच्या वातावरणामुळे व हातात सत्ता नसल्यामुळे रामचंद्रपंत झटून काम करत नव्हता. यामुळे ताराबाईंचा पंतावरील विश्वास कमी झाला व ती परशुरामपंतावरच अधिक जबाबदारी टाकू लागली. या काळातील त्याच्या कामगिरीविषयी गोरे म्हणतात, "ताराबाईंचे व्देषबुध्दयात्मक स्त्री स्वभावजन्य अदूर दृष्टीचे आग्रही स्वभावाने त्यास राज्य कारभारात पुष्कळ अडचणी येत. या कारणाने तो पूर्वीप्रमाणे संतोषाने काम करीत नसे." [31]

या वरुन रामचंद्रपंत सत्तेचा किती लोभी होता हे कळून येते. सत्ता नसल्यामुळे तो पूर्वीप्रमाणे झटून, आनंदाने काम करत नसे. "रामचंद्रपंत अमात्य याजकडे कुलअखत्यार होता. परंतु ते ताराबाईच्या आग्रही स्वभावामुळे पूर्वीप्रमाणे झटून काम न करता जितक्यास तितके करु लागला." [32]

पुढे औरंगजेबाच्या मृत्युनंतर संभाजीपुत्र शाहूची मोगली कैदेतून सुटका झाली व तो दक्षिणेत आला. यावेळी सत्तांध ताराबाईने शाहूस विरोध केला. यावेळी पंत व ताराबाई यांच्यातले संघर्ष विकोपास गेले होते व त्यामुळे ताराबाईंनी पंताना रुप्याची बेडी घालून वसंतगडावर कैदेत ठेवले होत. पण १७०८ मध्ये आलेल्या शाहू व ताराबाई यांच्यातील खेडच्या युध्दात ताराबाईंचा पराभव झाला. त्यामुळे ताराबाईंचा पंतासारख्या अनुभवी माणसाची गरज भासू लागली. त्यामुळे ताराबाईने पंताना कैदेतून सोडवले व छ. शिवाजी व संभाजी यांना त्यांच्या मांडीवर बसवून राज्य रक्षणाची विनंती केली. तेव्हा ते परत अमात्य पदावर आले.

म्हणजेच पंताना माहित होते की ताराबाईंचे आपल्या शिवाय काहीही चालणार नाही. म्हणून त्याने शाहू बरोबर पत्रव्यवहाराचे नाटक सुरु केले होते व त्याप्रमाणे त्याने आपल्या हातात सत्ता घेतली होती.

> "ताराबाईच्या विरुध्द शाहू महाराजांना जाऊन मिळण्याची तयारी रामचंद्रपंत अमात्यांनी दाखविली होती. मात्र त्यासाठी शाहू महाराजांकडे त्यांनी निरनिराळ्या वतनांची व स्वतःला हुकुमतपन्हा म्हणून साताराला ठेवण्याची अट घातली होती." [33]

म्हणजेच दोन स्वार्थी सत्ताधिशांनी एकमेकांच्या मदतीने एकमेकांच्याकडे सत्ता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आपणास दिसून येतो. तरी सुध्दा ताराबाई व पंत यांच्यामधील वाद मिटला होता असे नाही. १७१९ मध्ये रामचंद्रपंताचे ताराबाई व शिवाजी यांना अटक करून राजसबाईचा मुलगा संभाजी याला गादीवर बसवले. या कोल्हापूरातील राज्यक्रांती मागे रामचंद्रपंताचा हात असल्याचे अनेक पुराव्यावरून स्पष्ट झाले आहे. या राज्यक्रांतीचे कारण अनेक इतिहासकारांनी कोल्हापूरच्या राज्याचे रक्षण करणे असे दिले आहे. परंतु खरे पाहता या मागे रामचंद्रपंताचा स्वार्थी हेतू असावा. कारण ताराबाई सुध्दा सत्तालालसी स्त्री होती. आणि राज्यकारभार तिच्या हातामध्ये होता ही गोष्ट रामचंद्रपंताना खटकत होती म्हणूनच त्यानी ही राज्यक्रांती घडवून आणली असावी असे वाटते.

या वरून असे वाटते की रामचंद्रपंताना शिवाजी ,संभाजी व ताराबाई यासारख्या कर्तबगार शासका ऐवजी सौम्य प्रकृतीचा शासक जास्त योग्य वाटत होता कारण अशा शासकाच्या नाममात्र अधिकाराखाली त्याला अमर्याद सत्ता वापरता येत होती.

••

## टीपा

१ ग.ह.खरे आणि शं.ना., - जोशी (संपा.), शिवचरित्र-साहित्य खंड, ३रा (पुणे: शं.ना.जोशी, १९३०), ले. ४२६, पृ.क्र. ३७.

२ रा.म.गोरे, - बावडेकर पंत अमात्य हुकमतपन्हा यांचे वंशवृत्त, (प्रकाशनाचा तपशिल उपलब्ध नाही), पृ.क्र. २४.

३ शं.ना.जोशी आणि ल.म.भिंगारे, - आज्ञापत्र आणि राजनीति, (पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६०) पृ.क्र. ५९.

४ स.मा.गर्गे, - करवीर रियासत, (पुणे: राणे प्रकाशन, १९८०) पृ.क्र. ९१.

५ पं.श.जोशी छ.राजाराम व स्वातंत्र्य संग्राम, - मराठ्यांचा इतिहास, अ.रा.कुलकर्णी व ग.ह.खरे (संपा.), (कानपूर म.वि.ग्र.नि.मंडळ, १९८५), खंड पहिला, पृ.क्र. ४१४.

६ शा.वि.आवळसकर (संपा.), - शिवचरित्र साहित्य खंड -१ ला, (पुणे: भा.इ.स.मंडळ प्रकाशित, १९५४) प.क्र. १६, पृ.क्र. २४.

७ गो.स.सरदेसाई, - मराठी रियासत पुण्यश्लोक शाहू ५, (मुंबई: के.मि.ढवळे, १९४२) पृ.क्र. ५३.

८ - किल्ता - पृ.क्र. ५३.

९ के.गो.स्त्नांस(संपा.), पंत अमात्य बावडा दप्तर,
(गगनबावडा: सेक्रेटरी ज.बावडा, १९३७,
प.क्र.७२, पृ.क्र.१४०.

१० गोरे, तत्रैव - पृ.क्र.२५.

११ गोरे, तत्रैव - पृ.क्र.१९.

१२ वा.सी.बेन्द्रे, छ.संभाजी महाराज,
(मुंबई: पॉ.पॉ.प्य.बुक स्टॉल प्रकाशन
१९७१), पृ.क्र.७४.

१३ Patil S.V., Maharani Tarabai of Kolhapur:
(Delhi:S.Chand & Co.,Pvt.,1987)
P.No.1,(Translation mine)

१४ वि.का.राजवाडे(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने,
(विजापूरकर वि.गो.,१९०३),
ले.४३, पृ.क्र.४६.

१५ वा.सी.बेन्द्रे, छ.राजाराम महाराज,
(मुंबई: लोकवाङ्मय प्रकाशन,१९७५),
पृ.क्र.२५२ । २६३.

१६ गोरे, तत्रैव - पृ.क्र.३८.

१७ र.वि.हेरवाडकर(संपा.), श्री छ.संभाजी महाराज आणि थोरले
राजाराम महाराज यांची चरित्रे,
(पुणे: व्हिनस प्रकाशन,१९७२),पृ.क्र.२५.

१८ वि.का.राजवाडे(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने,
(धुळे: श्री आत्माराम छापखाना),
१९१२), खंड १५,पृ.क्र.३७६.

१९ गर्गे, तत्रैव - पृ.क्र. ४३.

२० वा.वा.खरे, हिम्मतबहादूर चव्हाण घराण्याचा इतिहास, १९५०, पृ.क्र. ०८.

२१ S.M.Pagadi, Mughal Maratha Relations, (Nagpur: Nagpur University Publi., 1964), Page No.91, (Translation mine)

२२ सरदेसाई, तत्रैव - पृ.क्र. ६५.

२३ गर्गे, तत्रैव - पृ.क्र. ३०.

२४ पुरंदरे दप्तर भाग पहिला, प.क्र. १३ पृ.क्र. ७.

२५ बेन्द्रे, तत्रैव - पृ.क्र. २७८.

२६ गोरे, तत्रैव - पृ.क्र. ४९.

२७ किल्ला - पृ.क्र. ५०.

२८ Brij Kishor, Tara Bai and Her Times, (Bombay: Asia Publishing House, 1963) Page No.63, (Translation as mine)

२९ Ibid - Page No.53, (Translation mine)

३० सरदेसाई, तत्रैव - पृ.क्र. ५५.

३१ गोरे, तत्रैव - पृ.क्र. ५६.

३२ बा.प्र.मोडक, कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास, (पुणे: आर्यभूषण छापखाना, १९२५) पृ.क्र. २१.

33 Patil, Page No.190 (Translation mine)